वितरण आदेश

नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रीय खत कार्यक्रमांतर्गत सन २०१९-२०२० साठीचे अनुदान वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः **बीजीएस २०१९/प्र.क्र.४०/योजना-१/५**

बांधकाम भवन इमारत, २५, मर्झबान पथ,

फोर्ट, मुंबई- ४०० ००१

तारीख: १९ मार्च, २०२०

वाचा :-

१) केंद्र शासनाचे पत्र क्र. २५३/१६/२०१७ - BIOGAS, दिनांक ३० मे, २०१८

२) केंद्र शासनाचे पत्र क्रमांक : २५३/१६/२०१७-BIOGAS , दिनांक १० जुलै, २०१९

३) शासन पत्र क्रमांक बीजीएस-२०१९/प्र.क्र.४०/योजना-१, दिनांक ०६ ऑगस्ट, २०१९

४) ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक बीजीएस-२०१८/प्र.क्र.९०/योजना-१, दिनांक १२ जुलै, २०१९

५) ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक बीजीएस-२०१९/प्र.क्र.४०/योजना-१, दिनांक २०नोव्हेंबर, २०१९

प्रस्तावना :-

नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रीय खत कार्यक्रम ही १००% केंद्र पुरस्कृत योजना आहे. संदर्भिय आदेश क्र. ५ अन्वये “नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रीय खतव्यवस्थापन कार्यक्रम (NNBOMP)” या योजनेच्या अनुषंगाने, निधी आहरण व संवितरण करणेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांना “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

२. संदर्भिय आदेश क्र. २ अन्वये केंद्र शासनाकडून सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता राज्यास ८५०० बायोगॅस संयंत्राचे उद्दिष्ट मंजूर केलेले आहे. त्यानुसार संदर्भिय क्र. ३ अन्वये सन २०१९-२० करिता राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना त्यांच्या मागणीनुसार एकूण ७५०० बायोगॅस संयंत्राचे उदिष्ट कळविलेले आहे. संदर्भीय क्रमांक ५ अन्वये सदर उद्दिष्टांच्या अनुषंगाने सन २०१९-२० या वर्षाकरिता

एकूण अनुदानाच्या ५०% रक्कम याप्रमाणे रू. ४,७०,८२,५००/- PFMS प्रणालीं व्दारे जिल्हयांना वितरीत करण्यात आलेला आहे. उर्वरित ५०% निधी राज्यस्तरीय बँक बचत खात्यात जमा करून PFMS प्रणाली व्दारे जिल्हयांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णयः-

नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रीय खत कार्यक्रमासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी बायोगॅस संयंत्र बांधकाम व अनुषंगिक बाबींसाठी या शासन निर्णयान्वये एकूण रू. ४,७०,८२,५००/- (रू. चार कोटी सत्तर लक्ष ब्याऐंशी हजार पाचशे मात्र) इतका निधी खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे. अर्थसंकल्पिय प्रणालींवर उपलब्ध करून दिलेल्या निधीमधून रू. ४,७०,८२,५००/- (रू. चार कोटी सत्तर लक्ष ब्याऐंशी हजार पाचशे मात्र) इतका निधी राज्यस्तरावरील PFMS प्रणालीसाठी नोंदणी करण्यात आलेल्या पंजाब नॅशनल बँक, ठाणे शाखा येथील बँक बचत खाते क्रमांक ११४४०००१०५११७२५२ यावर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

३. सदर निधीपैकी, या बचत खात्याचे “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित केलेले मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांनी PFMS प्रणालीद्वारे रकाना क्रमांक २१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे एकूण रक्कम रू. ४,७०,८२,५००/- /- (रू. चार कोटी सत्तर लक्ष ब्याऐंशी हजार पाचशे मात्र) संबंधित जिल्हयांना वितरीत करावी. सदर निधी दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत खर्च करणे बंधनकारक राहिल.

४. केंद्र शासनाच्या अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत मंत्रालयाकडून मागण्या (क्लेम्स) पूर्णत: अदा केल्या जातील असे गृहीत धरुनच राज्य शासनाकडून जिल्हा परिषदांना उद्दिष्टांनुसार अनुदानाची रक्कम मंजूर करण्यात येते. या मागण्यांच्या बाबतीत केंद्र शासनाने नाकारलेली रक्कम यानंतर देण्यात येणाऱ्या अनुदानातून वळती करून घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

५. सन २०१९-२० या आर्थिक वर्षात नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रीय खत कार्यक्रम ही योजना राबविण्यासाठी केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या संदर्भ क्रमांक १ मध्ये नमूद केलेल्या आदेशाप्रमाणे अनुदानाचे दर लागू राहतील.

६. प्रस्तुत खर्च “मागणी क्रमांक एल-३, २८१० नवीन व नवीकरणीय ऊर्जा, ०१, बॉयो एनर्जी १०१, राष्ट्रीय बायो गॅस विकास कार्यक्रम (०१), राष्ट्रीय बायोगॅस व खत व्यवस्थापन कार्यक्रम (०१) (०१) गोबर गॅस संयंत्रे बसविणे. (२८१० ००१६) (केंद्र पुरस्कृत योजना १०० टक्के) (कार्यक्रम) ३३, अर्थसहाय्य” या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी मंजूर केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

७. या शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्रातील रकाना क्रमांक २१ मध्ये दर्शविलेल्या रक्कमेपेक्षा अधिक खर्च होणार नाही याची दक्षता आहरण व संवितरण अधिकारी यांनी घ्यावी.

८. सन २०१९-२० या आर्थिक वर्षात नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रीय खत कार्यक्रमासाठी वितरीत केल्या जाणाऱ्या अनुदानापैकी कोषागारातून आहरीत केलेल्या रक्कमेचे विहित नमुन्यातील उपयोगिता प्रमाणपत्र (ज्यामध्ये व्हाऊचर क्रमांक, अनुदान आहरित केल्याचा दिनांक, अनुदान आहरणाचे प्रयोजन, मुख्य लेखाशिर्ष, आऊटवर्ड नंबर, इत्यादी बाबीसह) महालेखाकार मुंबई व नागपूर यांना एप्रिल-२०२० अखेर पर्यंत पाठविणे आवश्यक राहील. सन २०१९-२० च्या उपयोगिता प्रमाणपत्रासंबंधी महालेखापाल कार्यालय मुंबई/नागपूर यांचेकडुन मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद यांना प्राप्त झालेले Clearances Certificate मे-२०२० पर्यंत शासनास पाठविण्याची जबाबदारी कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांची राहील.

९. सदर योजनेच्या अंमलबजाणीसाठी दरवर्षी जिल्हा परिषदांना उद्दिष्टांच्या अनुषंगाने बाबनिहाय संपूर्ण अनुदान शासन स्तरावरून उपलब्ध करून देण्यात येते. त्यानुसार जिल्हा परिषदांनी पूर्ण केलेल्या भौतिक उद्दिष्टांच्या अनुषंगाने बाब निहाय खर्च करून आर्थिक वर्षअखेर ताळमेळ पूर्ण करावयाचे आहेत. बाबनिहाय रक्कम अखर्चित राहिल्यास, अशी शिल्लक रक्कम शासनास त्वरीत परत करण्यात यावी. अशी कोणतीही अखर्चित शिल्लक राहीलेली रक्कम पुढील आर्थिक वर्षात खर्च करता येणार नाही.

१०. प्रत्यक्ष केलेल्या खर्चाचे अचूक क्लेम्स (Claims) माहे जून, २०२० अखेरपर्यंत शासनास सादर करण्यात यावेत. तसेच या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेले अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहे, त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे. नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रीय खत कार्यक्रम (NNBOMP) ही १००% केंद्र पुरस्कृत योजना असून, २० कलमी कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा घटक असल्याने मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सदर आदेशानुसार या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी तातडीने लाभार्थ्यांना अनुदान वितरित करावे.

११. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौसं क्र. ७८/१९/१४४४ दिनांक ०७.०५.२०१९ व वित्त विभागाच्या अनौ.सं.क्र. २६०/२०१९/व्यय-१५ दिनांक २९.०६.२०१९ व अनौपचारिक संदर्भ क्रमांक २७४/२०१९/कोषा प्रशा-५ दिनांक ०८.०७.२०१९ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेने व सहमतीने निर्गमित करण्यात आलेल्या उक्त संदर्भ क्रमांक ४ येथील शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार व वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं- २०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३ दिनांक ०८ जुलै, २०१९ अन्वये दिलेल्या सूचनांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२००३१९१२११३३७१२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Hemant Sudhakar Pathak

Digitally signed by Hemant Sudhakar Pathak
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1a58924bb1ebc2ed6699e048bfa42ad41d1ed32de1e3eda84d0c03040473905e, cn=Hemant Sudhakar Pathak
Date: 2020.03.19 17:50:21 +05'30'

(हे. सु. पाठक)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. महालेखापाल महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परिक्षा)/ (लेखा व अनुज्ञेयता)
३. महालेखापाल महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता)
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
५. मुख्य लेखा व वित्त अधिकारी , जिल्हा परिषद (सर्व)
६. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई
७. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८. उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व)
९. जिल्हा लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा (सर्व)
१०.संचालक, लेखा कोषागारे, महाराष्ट्र, मुंबई.
११.जिल्हा कोषगार अधिकारी (सर्व
१२.नियोजन विभाग, कार्यासन १४४३/१४४४, मंत्रालय, मुंबई
१३.वित्त विभाग, मंत्रालय (व्यय-१५ /अर्थ-१७), मंत्रालय, मुंबई.
१४.व्यवस्थापक, पंजाब नॅशनल बँक, शिल्पयान, शिवाजी पथ, जि. ठाणे ४०० ०६३
१५.कार्यासन क्रमांक वित्त-१, वित्त-२, वित्त-७, वित्त-८, योजना-२, ग्राम विकास विभाग.
१६. निवड नस्ती, कार्यासन योजना-१/५, ग्राम विकास विभाग.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षात बायोगॅस कायक्रमाच्या अंमलबजावणीसाठी वितरीत करावयाचा निधी तपशिल																				
अ. क्र.	जिल्हा	दिनांक ०६ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या पत्रान्वये सन २०१९-२० करीता निश्चित केलेले उदिष्ट								शौचालय जोडणी उदिष्ट				जिल्हयांना दिलेल्या उदिष्टानुसार उपलब्ध करून दयावयाचे एकूण सहाय्यक अनुदान					शासन निर्णय दिनांक २० नोव्हेंबर, २०१९ अन्वये जिल्हयांना वितरीत केलेले सहाय्यक अनुदान (रकाना क्र. १९ च्या ५०%) रू.	**या शासन निर्णयान्वये जिल्हयांना वितरीत करावयाचे उर्वरित ५०% सहाय्यक अनुदान (रकाना क्र. १९ -२०) रू.**
		बायोगॅस संयंत्राचे प्रवर्गनिहाय उदिष्ट				प्रशिक्षण वर्ग उदिष्ट														
		सर्वसाधारण	SC	ST	एकुण	CMC	User Course	Staff Course	Turn Key Worker Course	सर्वसाधारण	SC	ST	एकुण	सर्वसाधारण (रकाना नं.३ x रू.१२०००/-) रू.	SC/ST (रकाना नं.४+५ X रू. १३०००) रू.	खर्च प्रति (CMC रू. ५००००/- User Course रू. ४०००/- Staff Course रू. १००००/- Turn Key Course रू.७५०००/- रू.	प्रशासकीय व प्रचार प्रसिद्धी खर्च (प्रति संयंत्र २८६.६७/- +५३.३३/- प्रमाणे) रू.	**एकूण अनुदान (रकाना १५+१६+१७+१८) रू.**		
१	**२**	**३**	**४**	**५**	**६**	**७**	**८**	**९**	**१०**	**११**	**१२**	**१३**	**१४**	**१५**	**१६**	**१७**	**१८**	**१९**	**२०**	**२१**
१	ठाणे	२०	०	१०	३०	०	१	०	०	०	०	०	०	२४००००	१३००००	४०००	९४००	३८३४००	१९१७००	१९१७००
२	पालघर	३५	३	८७	१२५	०	२	०	०	०	०	०	०	४२००००	११७००००	८०००	३९१६६	१६३७१६६	८१८५८३	८१८५८३
३	रायगड	१२६	१३	१४	१५३	०	०	०	०	०	०	०	०	१५१२०००	३५१०००	०	४७९४०	१९१०९४०	९५५४७०	९५५४७०
४	रत्नागिरी	१७७	२३	०	२००	२	३	१	०	०	०	०	०	२१२४०००	२९९०००	१२२०००	६२६६६	२६०७६६६	१३०३८३३	१३०३८३३
५	सिंधुदुर्ग	४८५	१५	०	५००	१	६	०	०	०	०	०	०	५८२००००	१९५०००	७४०००	१५६६६६	६२४५६६६	३१२२८३३	३१२२८३३
६	**नाशिक**	२०१	३२	१९	२५२	०	१	०	०	०	०	०	०	२४१२०००	६६३०००	४०००	७८९६०	३१५७९६०	१५७८९८०	१५७८९८०
७	धुळे	२०	५	१७	४२	०	१	०	०	०	०	०	०	२४००००	२८६०००	४०००	१३१६०	५४३१६०	२७१५८०	२७१५८०
८	नंदुरबार	१८	०	६४	८२	०	१	०	०	०	०	०	०	२१६०००	८३२०००	४०००	२५६९४	१०७७६९४	५३८८४७	५३८८४७
९	जळगांव	९०	५	५	१००	०	१	०	०	०	०	०	०	१०८००००	१३००००	४०००	३१३३४	१२४५३३४	६२२६६७	६२२६६७
१०	अहमदनगर	६५०	४५	५	७००	१	११	१	१	०	०	०	०	७८०००००	६५००००	१७९०००	२१९३३२	८८४८३३२	४४२४१६६	४४२४१६६
११	**पुणे**	६३७	१६	२२	६७५	०	१०	०	०	०	०	०	०	७६४४०००	४९४०००	४००००	२११४९८	८३८९४९८	४१९४७४९	४१९४७४९
१२	सातारा	२८५	१५	०	३००	०	५	०	०	०	०	०	०	३४२००००	१९५०००	२००००	९४०००	३७२९०००	१८६४५००	१८६४५००
१३	सांगली	३९५	१५	०	४१०	०	४	०	०	०	०	०	०	४७४००००	१९५०००	१६०००	१२८४६६	५०७९४६६	२५३९७३३	२५३९७३३

१४	सोलापूर	४२०	३०	०	४५०	०	२	०	०	०	०	०	०	५०४००००	३९००००	८०००	१४१०००	५५७९०००	२७८९५००	२७८९५००
१५	कोल्हापूर	१०३१	३९	०	१०७०	१	१४	१	०	०	०	०	०	१२३७२०००	५०७०००	११६०००	३३५२६४	१३३३०२६४	६६६५१३२	६६६५१३२
१६	**औरंगाबाद**	४६४	३४	२	५००	०	८	०	०	०	०	०	०	५५६८०००	४६८०००	३२०००	१५६६६४	६२२४६६४	३११२३३२	३११२३३२
१७	जालना	१४२	८	०	१५०	०	१	०	०	०	०	०	०	१७०४०००	१०४०००	४०००	४७०००	१८५९०००	९२९५००	९२९५००
१८	परभणी	८५	१५	०	१००	०	२	०	०	०	०	०	०	१०२००००	१९५०००	८०००	३१३३२	१२५४३३२	६२७१६६	६२७१६६
१९	हिंगोली	७५	१५	१०	१००	०	२	०	०	०	०	०	०	९०००००	३२५०००	८०००	३१३३२	१२६४३३२	६३२१६६	६३२१६६
२०	बीड	८५	१०	५	१००	०	२	०	०	०	०	०	०	१०२००००	१९५०००	८०००	३१३३२	१२५४३३२	६२७१६६	६२७१६६
२१	नांदेड	८०	१५	५	१००	०	१	१	०	०	०	०	०	९६००००	२६००००	१४०००	३१३३२	१२६५३३२	६३२६६६	६३२६६६
२२	उस्मानाबाद	१७६	२४	०	२००	०	३	०	०	०	०	०	०	२११२०००	३१२०००	१२०००	६२६६६	२४९८६६६	१२४९३३३	१२४९३३३
२३	लातूर	७५	२०	५	१००	०	२	०	०	०	०	०	०	९०००००	३२५०००	८०००	३१३३२	१२६४३३२	६३२१६६	६३२१६६
२४	**अमरावती**	३८	२२	१०	७०	०	२	०	०	०	०	०	०	४५६०००	४१६०००	८०००	२१९३२	९०१९३२	४५०९६६	४५०९६६
२५	बुलढाणा	९२	१७	३	११२	०	२	०	०	०	०	०	०	११०४०००	२६००००	८०००	३५०९२	१४०७०९२	७०३५४६	७०३५४६
२६	वाशिम	१०	१	१	१२	०	१	०	०	०	०	०	०	१२००००	२६०००	४०००	३७८६	१५३७८६	७६८९३	७६८९३
२७	अकोला	५०	१७	३	७०	०	०	०	०	०	०	०	०	६०००००	२६००००	०	२१९३२	८८१९३२	४४०९६६	४४०९६६
२८	यवतमाळ	२८	१८	४	५०	०	१	०	०	०	०	०	०	३३६०००	२८६०००	४०००	१५६६८	६४१६६८	३२०८३४	३२०८३४
२९	**नागपूर**	५३	२०	१०	८३	०	१	०	०	०	०	०	०	६३६०००	३९००००	४०००	२६००६	१०५६००६	५२८००३	५२८००३
३०	वर्धा	७५	२९	१६	१२०	१	२	०	०	०	०	०	०	९०००००	५८५०००	५८०००	३७६००	१५८०६००	७९०३००	७९०३००
३१	भंडारा	७४	२०	१०	१०४	०	२	०	०	०	०	०	०	८८८०००	३९००००	८०००	३२५८६	१३१८५८६	६५९२९३	६५९२९३
३२	गोंदिया	१६३	७	१०	१८०	०	१	०	०	०	०	०	०	१९५६०००	२२१०००	४०००	५६३९८	२२३७३९८	१११८६९९	१११८६९९
३३	चंद्रपूर	१३५	३०	१५	१८०	०	३	०	०	०	०	०	०	१६२००००	५८५०००	१२०००	५६३९८	२२७३३९८	११३६६९९	११३६६९९
३४	गडचिरोली	१०	१०	६०	८०	०	२	०	०	०	०	०	०	१२००००	९१००००	८०००	२५०६६	१०६३०६६	५३१५३३	५३१५३३
एकूण		६५००	५८८	४१२	७५००	६	१००	४	१	०	०	०	०	७८००००००	१३००००००	८१५०००	२३५००००	९४१६५०००	४७०८२५००	४७०८२५००